International Year of Cooperatives 2025

महाराष्ट्र शासन

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.**

दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - commpat2018@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/लाडकी बहिण/पत नोंदणी/१४१३/२०२५ दिनांक :- ११ जून, २०२५

# परिपत्रक

**विषय :- 'लाडकी बहिण' योजनेंतर्गत लाभार्थी महिलांची नागरी सहकारी पतसंस्था नोंदविणेबाबत - महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन**

मा.सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे दि.०९/०६/२०२५ रोजीचे व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे झालेल्या बैठकीमधील चर्चेनुसार 'लाडकी बहिण' योजनेंतर्गत लाभार्थी महिलांचे सर्वांगीण विकासासाठी, योजनेतील सहभागी महिलांची महिला नागरी सहकारी पतसंस्था नोंदणी करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र शासनातर्फे 'लाडकी बहिण' योजनेंतर्गत ज्या महिलांना आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे, अशा महिलांची जिल्हा अंतर्गत नागरी सहकारी पतसंस्था नोंदविणेबाबत या कार्यालयाचे दि.०८/०३/२०१९ चे परिपत्रकातील नोंदणी निकषानुसार संस्था नोंदणी प्रक्रिया करण्यात यावी.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील नियम, १९६१ मधील संस्था नोंदणीबाबत तरतूदींचे पालन करण्यात यावे.

३. सदर महिला सहकारी पतसंस्थांचे सभासद होणाऱ्या लाभार्थी सभासद महिलांची यादी महिला व बाल विकास विभाग यांचेकडून प्रमाणित करुन घेण्यात यावी.

४. दि.०८/०३/२०१९ चे परिपत्रकातील मुद्दा क्र.(ब) विशेष वर्गवारीतील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या नोंदणीबाबत निकष :

| अ.क्र. | विशेष वर्गवारी | कार्यक्षेत्र | प्राथमिक सभासद संख्या | नोंदणी समयी भाग भांडवल रुपये |
|---|---|---|---|---|
| ३) | महिला | वॉर्ड/प्रभाग (मुंबई/ठाणे/नवी मुंबई) | १००० | रु.१५ लाख |
| | | वॉर्ड/प्रभाग (उर्वरित महानगरपालिका) | ८०० | रु.१० लाख |
| | | महानगरपालिका (मुंबई/ठाणे/नवी मुंबई) | २००० | रु.३० लाख |
| | | उर्वरित महानगरपालिका कार्यक्षेत्र | १५०० | रु.२० लाख |
| | | नगरपालिका | ५०० | रु.५ लाख |
| | | गाव | २५० | रु.१.५० लाख |
| | | तालुका | ५०० | रु.५ लाख |
| | | जिल्हा | १५०० | रु.१० लाख |

५. उपरोक्त निकष पुर्ततेबरोबर खालील बाबींची पुर्तता करणे बंधनकारक आहे.

(i) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांचे गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याबाबत संबंधित कार्यक्षेत्रातील पोलिस स्टेशनमधील जबाबदार अधिकाऱ्याकडून अद्यावत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

(ii) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांनी मा.कार्यकारी दंडाधिकाऱ्यासमोर खालील मुद्दे समाविष्ठ असलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य राहील.

अ) मुख्य प्रवर्तक, इतर प्रवर्तक व समाविष्ट प्रवर्तक सभासद यांचे आपला ग्राहक जाणा (Know Your Customer) बाबत १००% पूर्तता केली आहे.

ब) मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक हे सावकारी (Money Lending) किंवा तत्सम प्रकारचा कोणताही व्यवसाय करीत नाहीत.

क) मुख्य प्रवर्तक व इतक प्रवर्तक हे कोणत्याही सहकारी संस्थेचे थकबाकीदार नाहीत.

ड) मुख्य प्रवर्तक व इतर १० प्रवर्तक हे समान उद्देश असलेल्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत झालेल्या इतर सहकारी संस्थेचे संचालक नाहीत.

इ) संस्थेचे ठेवी व कर्ज व्याजदराचे धोरण हे सहकार खात्याने वेळोवेळी निर्देशित केलेल्या निकषांशी विसंगत व अवास्तव स्पर्धा करणारे असणार नाहीत.

(iii) उपरोक्त नमूद महत्त्वाचे निकष व त्या व्यतिरिक्त दि.०८/०३/२०१९ रोजीचे परिपत्रकामधील इतर निकषांची पूर्तता होणाऱ्या नियोजित पतसंस्थांची नोंदणी करण्यात यावी. नियोजित संस्था निकषांची पूर्तता करीत नसल्यास अशा संस्थांची नोंदणी नाकारण्यात यावी.

६. सदर पतसंस्था नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी व नोंदणीनंतर पतसंस्था योग्यप्रकारे चालविण्यासाठी मार्गदर्शन करणेसाठी प्रत्येक पतसंस्थेसाठी सहकार विभागातील सहाय्यक निबंधक दर्जाचा अधिकारी यांची 'पालक अधिकारी' म्हणून नियुक्ती करावी. तसेच सदर पालक अधिकारी यांना सदर पतसंस्थांना हिशोब लेखन, संस्था व्यवस्थापन, ठेवी स्विकारणे, कर्जवाटप करणे, संचालक मंडळ सभा व वार्षिक सभा इतिवृत्त लेखन, लेखापरिक्षण, तसेच कायदेशीर बाबींसंदर्भात योग्य ते मार्गदर्शन करणेबाबत आपले स्तरावरुन सुचना देण्यात याव्यात.

Taware

**(दिपक तावरे** भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,
१) विभागीय सहनिबंधक (प्रशासन), सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी :
व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), गृह निर्माण भवन (म्हाडा), कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :
१) मा.प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई